# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(दुपार)**

**दिनांक १९.०८.२०२६ बुधवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १८.०८.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ०९ केसेसमध्ये ११ ईसमावर कारवाई करून एकुण ६,३०,३९०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०२ केसेसमध्ये ०९ इसमांवर कारवाई करुन ३,५५०/—रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,५२६ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,२६,९००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक १८.०८.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक १९.०८.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये **०८** इसमावर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ३ पोलीसांची कामगीरी :— घरफोडी व वाहनचोरीचे ०५ गुन्हे उघडकीस. १५,५५,८९०/—रू. चा मुद्देमाल जप्त.**

दिनांक १८.०८.२०२६ चे २०.०० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. ३ चे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर माहीती मिळाली की, पोलीस ठाणे कोतवाली हद्दीत नवाबपुरा येथे एका बिर्याणी सेंटर समोर, निळ्या रंगाची अॅक्टीवाजवळ काही ईसम चोरीचे पैशाची वाटणी करीत आहेत. अशा खात्रीशीर माहीतीवरून नमुद ठिकाणी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचे ०६ ईसम दिसुन आले. त्यांना घेराव टाकुन ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यांचे नांव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांची नावे १) भुषण अशोक ठाकरे, वय २३ वर्षे, २) गौरव सुरेश खडसे, वय २१ वर्षे, दोन्हीही रा. नवाबपुरा, कोतवाली, नागपुर ३) अमन किसनदेव सहानी, वय २५ वर्षे, रा. इंदर खदान कॉलोनी नं. ६, टेकाडी, पारशिवनी, जि. नागपुर ४) क्रिश रामचरीत जैस्वाल, वय १९ वर्षे, रा. वार्ड क्र. ७, संताजी नगर, कन्हान, कांद्री, जि. नागपुर असे सांगीतले व दोन मुले ही अल्पवयीन असल्याचे निष्पन्न झाले. त्यांची व त्यांचे ताब्यातील निळ्या रंगाचे अॅक्टीवा गाडीची झडती घेतली असता, गाडीचे डिक्कीत चांदीचे वेगवेगळ्या वस्तु, मुर्ती व सिक्के असा मुद्देमाल मिळुन आला. मुद्देमालाबाबत विचारणा केली असता, त्यांनी पो. ठाणे वर्धा व रामनगर, जि. वर्धा हद्दीत घरफोडी केल्याची कबुली दिली. आरोपींना सखोल विचारपुस केली असता, त्यांनी पोलीस ठाणे वर्धा, सेलु व रामनगर हद्दीत तसेच, पोलीस ठाणे लकडगंज, नागपुर शहर हद्दीत ०४ घरफोडी व पो. ठाणे अजनी हद्दीत ०१ वाहनचोरी असे एकुण ०५ गुन्हे केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन गुन्ह्यातील चोरी केलेला मुद्देमाल चांदीचे

वेगवेगळे दागिने व वस्तु, मुर्ती व सिक्के असा एकुण अेदाजे ०५ किलो वजनाची चांदी तसेच, ०५ मोबाईल फोन, अॅक्टीवा मोपेड क्र. एम. एच. ४९ सि.पी. १०६७ व गुन्ह्यात वापरेलेली रॉयल ईन्फील्ड ३५० एमएच. ४९ सिके. ६६१४ असा एकुण किंमती १५,५५,८९०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. आरोपीकडुन घरफोडीचे ०४ व वाहनचोरीचा ०१ असे एकुण ०५ गुन्हे उघडकीस आणलेले आहेत. आरोपींना तसेच ०२ विधीसंघर्षग्रस्त बालक यांना मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव वर्धा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. अतुल मोहनकर, पोउपनि. मधुकर काठोके, सफौ. ईश्वर खोरडे, संतोषसिंह ठाकुर, पोहवा. अजय पाटील, मनोज नेवारे, दिनेश डवरे, पोअं. विवेक भोयर, रोहीत काळे, चंद्रशेखर डेकाटे, जितेश रेड्डी, दीपक दासरवार, दीपक लाकडे, अनिल बोटरे, प्रमोद देशभ्रतार, विशाल रोकडे, मंगेश मेश्राम यांनी सायबर पथकाचे मदतीने केली.




**<u>३) गुन्हेशाखा वाहनचोरी विरोधी पथक पोलीसांची कामगीरी :— घरफोडी करणाऱ्या ०२ आरोपींना अटक. ०२ गुन्हे उघडकीस.</u>**

दिनांक ०२.०८.२०२६ चे २१.३० वा. ते दिनांक १७.०८.२०२६ चे १०.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत, प्लॉट नं. ८१, विघ्नहर्ता को—ऑप. सोसायटी, एनएमसी. गार्डन जवळ, नागपुर येथे राहणारे फिर्यादी अनिल व्यंकटराव मुजगेवार, वय ६८ वर्षे हे त्यांचे राहते घराला कुलुप लावुन, पुणे येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलुप तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लाकडी कपाटातुन सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण ५७,२२५/— रू. चा मुद्देमाल चोरून नेला. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा वाहनचोरी विरोधी पथकांचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक तपास करून व मिळालेल्या गुप्त माहीतीवरून, गुन्ह्यातील आरोपींना निष्पन्न करून, आरोपी नामे १) उमेश राजेश खांडेकर, वय २२ वर्षे, रा. पडकर चौक, गंगाबाई घाट, कोतवाली, नागपुर २) विकास उर्फ विक्की विजय पाली, वय २२ वर्षे, रा. ब्लॉक नं. ४१, क्वॉर्टर नं. ६४४, म्हाडा क्वॉर्टर, कपीलनगर, नागपुर यांना ताब्यात घेवुन, त्यांना विचारपूस केली असता, त्यांनी वर नमुद घरफोडीचा गुन्हा त्यांचे साथीदार पाहीजे आरोपी

क्र. १) गोविंद उर्फ गोबा काशीराम साखरे, वय २२ वर्षे, २) दयाशंकर उर्फ सागर संतोष बघेल, दोन्हीही रा. म्हाडा क्वॉर्टर, कपीलनगर, नागपुर यांचेसह संगणमताने केल्याची कबुली दिली. आरोपींना अधिक विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद गुन्ह्याव्यतीरिक्त पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत ईतर १ घरफोडीचा गुन्हा असे एकुण ०२ गुन्हे केल्याची कबुली दिली. आरोपींचे ताब्यातुन सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिणे व चांदीच्या वस्तु व ०१ मोबाईल फोन असा एकुण ३,९०,९००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींना मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव गिट्टीखदान पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, वाहनचोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी केली.





**<u>४) गुन्हेशाखा, युनिट क्र. ५ पोलीसांची कामगिरी :— जुगार खेळणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक १८.०८.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक १९.०८.२०२६ चे ०३.०० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा, युनिट ०५ पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे कळमना हद्दीत, पावनगांव येथील टु—सिस्टर फार्महाऊस लॉनचे दुसरे माळ्यावर पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, नमुद ठिकाणी आरोपी क्र. १) गौरव गेंदलाल यादव, वय ३५ वर्षे, रा. म्हाडा क्वॉर्टर ३/१९, तुकडोजी पुतळा चौक, नागपुर २) रोशन आनंदराव उमरेडकर, वय ३८ वर्षे, रा. जुनी मंगळवारी, लकडगंज ३) गणेश ज्ञानचंद नवेश, वय ४१ वर्षे, रा. टिमकी, टोपरेचे विहीरीजवळ, तहसिल ४) कुणाल खुबचंद पाटील, वय ३२ वर्षे, रा. नंदनवन झोपडपट्टी, ५) सागर भिमराव सोमकुंवर, वय २८ वर्षे, रा. स्वामी नगर, नारी ६) संदीप भाऊरावजी नागरीकर, वय २८ वर्षे, रा. हिवरी नगर, नंदनवन ७) कैलास किसनराव डोंगरे, वय ४७ वर्षे, रा. बिनाकी मंगळवारी, पोळा मैदान ८) हर्षल महादेव डेकाटे, वय ३२ वर्षे, रा. घास बाजार, चिंतेश्वर मंदीर जवळ, लकडगंज ९) धर्मेंद्र राजेश शाहु, वय ३१ वर्षे, रा. ताज नगर, मानकापुर १०) निकेश राजु श्रीपाते, वय ३३ वर्षे, रा. राधेकृष्ण अपार्टमेंट, खरबी, वाठोडा ११) प्रकाश रवि सिंग, वय २८ वर्षे, रा. पवारपुरा, कन्हान, कांद्री १२) अभिषेक अनिल गोरे, वय २२ वर्षे, रा. गोळीबार चौक, टिमकी १३) आकाश रामु गुप्ता, वय ३१ वर्षे, रा. देशी भट्टीमागे, कळमना गांव १४) शेख रेहमान गुलाम दस्तविर, वय ४५ वर्षे, रा. आझाद फार्मसी जवळ, हसनबाग १५) सचिन रमेश ढाले, वय ४८ वर्षे, रा. गोळीबार चौक, टिमकी १६) तुषार छोटुजी लोणारे, वय ३९ वर्षे, रा. जुना बगडगंज, नंदनवन हे ताश पत्यावर पैश्याची बाजी लावुन हार—जीतचा जुगार खेळतांना समक्ष मिळुन आले. त्यांचे साथदीर पाहीजे आरोपी क्र. १) हरीष उर्फ मादी पराते, वय ३२ वर्षे, रा. झाडे चौक, शांतीनगर २) हरीष रमेश कुहीकर, वय ३३ वर्षे, रा. राणी भोसले नगर झोपड्पटटी, सक्करदरा ३) प्रणय संजयराव जाधव, वय ३२ वर्षे, राऊत नगर, दिघोरी ४) कार्तीक राजेश म्हैसकर, वय ३१ वर्षे, रा. श्री कॉलोनी, हुडकेश्वर ५) पवन सुधाकर

रेवतकर, वय २९ वर्षे, रा. छोटी तरोडी, आवास योजना, वाठोडा ६) राकेश हिरालाल मेश्राम, रा. बिडीपेठ, सक्करदरा ७) आकाश अजय खोब्रागडे, रा. विजय नगर चौक, कळमना हे घटनास्थळावरून पळुन गेले. आरोपींचे ताब्यातुन रोख ७२,७५०/—रू., वेगवेगळ्या कंपनीचे २२ मोबाईल फोन, ०७ दुचाकी वाहने, ०२ चारचाकी वाहने, ताश पत्ते व ईतर साहित्य असा एकुण २४,६३,७५०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे कळमना येथे कलम ४, ५ महा. जुगार प्रतिबंधक अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आरोपींना मुद्देमालासह कळमना पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास कळमना पोलीस करीत आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. विनायक गोल्हे, सपोनि. गणेश कदम, पोउपनि. विशाल सांगोडे, पोहवा. प्रविण भगत, नझीर शेख, राजु टाकळकर, राजेंद्र टाकळीकर, राजुसिंग राठोड, अनिस खान, चंद्रशेखर गौतम, गणेश कदम, मुकेश राऊत, अमोल भक्ते, पोअं. दीपक बावणकर, रोशन तांदुळकर व सुधीर तिवारी यांनी केली.



**<u>४) गुन्हेशाखा सामाजीक सुरक्षा विभाग पोलीसांची कामगिरी :— देहव्यवसाय करवुन घेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक १८.०८.२०२६ चे १४.२५ वा. चे सुमारास, गुन्हेशाखा सामाजीक सुरक्षा विभाग पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, त्यांनी पोलीस ठाणे कळमना हद्दीत, प्लॉट नं. १०४, भगत नगर, भरतवाडा रोड, कळमना, नागपुर येथे राहणारी आरोपी महीला नामे लक्ष्मी किशोर कुन्हे, वय ३६ वर्षे हीचे राहते घरी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे आरोपी महीला ही स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता ग्राहकांना देहव्यापाराकरीता जागा उपलब्ध करून, पिडीत मुलींकडुन देहव्यवसाय करवुन घेताना समक्ष मिळुन आली. आरोपीचे ताब्यातुन ०१ पिडीत अल्पवयीन मुलगी व ०१ महीला अशा दोघींची सुटका करण्यात आली. आरोपीचे ताब्यातुन रोख १,५००/—रू., एक मोबाईल फोन व ईतर साहित्य असा एकुण किंमती अंदाजे १६,५१०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीविरूध्द पोलीस ठाणे कळमना येथे कलम १४३(२)(३) भा.न्या.सं., सहकलम ३, ४, ५, ७ अनैतिक देहव्यापार प्रतिबंधक अधिनीयम अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाई कामी कळमना पोलीसांचे ताब्यात देण्यात आले.

वरील कामगिरी वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त

(गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. दर्शन पाटील, सपोनि. शिवाजी नन्नावरे, पोहवा. लक्ष्मण चौरे, प्रकाश माथनकर, किशोर ठाकरे, नितीन वासने, मपोहवा. लता गवई, आरती चव्हाण, पुनम शेंडे व पोअं. कमलेश क्षिरसागर यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे बेलतरोडी :— जिवे ठार मारणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक १८.०८.२०२६ चे १४.१७ वा. ते २१.४२ वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत, प्लॉट नं. १८, महालक्ष्मी नगर, मनिष नगर येथील 'हॉटेल स्टोरीज' मधील रूम नं. ३०२, तिसरा मजला येथे किरणकुमार संजय आत्राम, वय ३० वर्षे, रा. सेंट्रल कॉलोनी, क्वॉर्टर आरबि १/४०२/के, अजनी, नागपुर हा व फिर्यादीची बहीण शिवानी राजानंद गजभिये, वय २८ वर्षे, रा. प्लॉट नं. १३, रमा नगर, गल्ली नं. ५, पद्मा कॉन्व्हेंट जवळ, रामेश्वरी रिंगरोड, अजनी, नागपुर ह्या दोघांनी रूम बुक करून तेथे राहण्यास गेले होते. कोणत्यातरी अज्ञात कारणावरून, आरोपी किरणकुमार आत्राम याने फिर्यादीची बहीण शिवानी गजभिये हीला धारदार शस्त्राने वार करून जिवे ठार केले. व तो सुध्दा गंभीर जखमी अवस्थेत मिळुन आला. त्याला उपचाराकरीता मेडीकल हॉस्पिटल आयसियु येथे दाखल केले आहे. उपचार सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी नयन राजानंद गजभिये, वय ३८ वर्षे, रा. प्लॉट नं. १३, रमा नगर, गल्ली नं. ५, पद्मा कॉन्व्हेंट जवळ, रामेश्वरी रिंगरोड, अजनी, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे बेलतरोडी येथे पोउपनि. शिरीष सलगर यांनी आरोपी किरणकुमार आत्राम याचेविरुध्द कलम १०३(१) भान्यासं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पो.ठाणे बेलतरोडी चे वपोनि. रितेश आहेर ८४५१८२०२०२ हे करीत आहेत.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>१) पोलीस ठाणे मानकापुर</u> :—** दिनांक १८.०८.२०२६ चे १७.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे मानकापुर हद्दीत कल्पना टॉकीजमागे, पाचवे गल्लीमध्ये एका अपार्टमेंटचे बांधकाम साईडवर फिर्यादीचे मित्राचे वडील नामे यादव विठोबाजी गोन्नाडे, वय ५२ वर्षे, रा. हनुमान नगर, भांडेवाडी, नागपुर हे बिल्डींगचे ०६ वे माळ्यावर सेंट्रींगचे काम करीत असतांना, अचानक त्यांचा पाय स्लीप झाल्याने तोल जावुन, ते ०६ व्या माळ्यावरून जमिनीवर खाली पडल्याने गंभीर जखमी झाले. त्यांचेसोबत काम करणारे यांनी त्यांना उपचाराकरीता कुणाल हॉस्पीटल येथे नेले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी तपासुन त्यांना मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी उमाकांत हेमराज कुडके, वय २२ वर्षे, रा. हनुमान नगर, भांडेवाडी, नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे मानकापुर येथे पोहवा. राजेश कोचे ९९२०६१६५८६ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे ईमामवाडा :—** दिनांक ११.०८.२०२६ चे १५.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे ईमामवाडा हद्दीत, दिव्यांश शाळा, उंटखाना जवळील कंपाऊडचे फुटपाथवर एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ७० वर्षे वयाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल ट्रॉमा सेंटर येथे दाखल केले होत. उपचारादरम्यान दिनांक १८.०८.२०२६ रोजी ०२.३० वा. डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे ईमामवाडा येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे ईमामवाडा येथे पोउपनि. मारोती पोवार यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे जरीपटका :—** सौ. मिनाक्षी सुंदर महतो, वय ४० वर्षे, रा. प्लॉट नं. १४०, गल्ली नं. ०३, बुध्द विहार जवळ, कुशी नगर, जरीपटका, नागपूर ह्या दिनांक १५.०८.२०२६ चे ०८.०० वा. पासुन पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता सोबत मुलगा नामे सुरज महतो, वय १० वर्षेयाचेसह कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग— निमगोरा, चेहरा— गोल, बांधा— मजबुत, केस— काळे लांब, भाषा— हिंदी/मराठी बोलतात. ओळख— डाव्या हातावर 'पल्लु' असे नांव गोंदलेले आहे.

**२) पोलीस ठाणे बेलतरोडी :—** बसंत सुरज धुर्वे, वय १० वर्षे, रा. ह.मु.— ग्रीन लव्हरेज आश्रय अपार्टमेंटचे विरूध्द बाजुला बांधकाम साईडचे झोपडीमध्ये शंकरपुर, बेलतरोडी, नागपूर हा दिनांक ३०.०५.२०२६ चे १८.३० वा. पासुन पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीतील राहते घरून शौचास जातो असे सांगुन कुठेतरी निघुन गेला. घरी परत आला. नाही. त्याचा शोध घेतला असता मिळून आला नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा— गोल, बांधा— सडपातळ, उंची— ३ फुट ५ इंच, केस— काळे, अंगात— ग्रीन रंगाचे टि—शर्ट व पांढऱ्या रंगाचा फुलपॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी बोलतो.

**३) पोलीस ठाणे जरीपटका :—** कु. अंशीका सुनिल नितनवरे, वय १३ वर्षे, रा. गल्ली नं. ०३, इंदीरा नगर, डोंगरेचे घरी किरायाने, जरीपटका, नागपूर ही दिनांक १७.०८.२०२६ चे १०.०० वा. पासुन पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतुन, राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— सडपातळ, उंची— ४ फुट ६ इंच, केस— काळे लांब, भाषा— मराठी/हिंदी बोलते. ओळख— कपाळाचे माथ्यावर तिळ आहे.


सौ. मिनाक्षी


सुरज



बसंत


कु. अंशीका

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**